# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट १३८-२३** **दिनांक :- ०५/०५/२०२३**

## अनाधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक ०४/०५/२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, नयानगर पोलीस ठाण्याचे हद्दीतील मिरारोड रेल्वे स्टेशनजवळील स्कायवॉक ब्रिज, अस्मीता व्हिन्टेज व शांतीपार्क, सेक्टर-६, उमाकांत मिश्रा चौक, नयानगर मिरारोड पुर्व या परिसरात अनाधिकृतरित्या वास्तव्यास असलेले बांगलादेशी नागरिक कामासाठी येतात.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदरचे पो.नि. श्री. समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन पोलीस पथक, दोन पंच व दुभाषिक यांचेसह नयानगर पोलीस ठाणे हद्दीतील मिरारोड रेल्वे स्टेशन स्कायवॉक ब्रिजजवळ, अस्मीता व्हिन्टेज बिल्डींग व शांतीपार्क, सेक्टर-६, उमाकांत मिश्रा चौक, नयानगर, मिरारोड पुर्व या ठिकाणी सापळा कारवाई करुन ०६ स्त्री व ०२ पुरुष असे एकुण ०८ बांगलादेशी नागरिकांना सकाळी ०९.०० वा. ते ११.०५ वा.चे दरम्यान ताब्यात घेवून त्यांचेकडे प्राथमिक विचारपूस केली असता ते पारपत्र व व्हीजा न बाळगता अनाधिकृतपणे भारतात आल्याचे व वास्तव्य करीत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांचे विरुध्द म.पोअं. अश्विनी भिलारे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. २३३/२०२३ भारतीय पासपोर्ट अधिनियम कलम ३ (अ), ६(अ) सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १४ (अ) प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पो.अंम केशव शिंदे, म.पोअं.अश्विनी भिलारे, चा.पो.हवा. सम्राट गावडे व महिला म.सु.ब. शुभांगी मोकल सर्व नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

----ooo----